# संशोधन अहवाल

प्रा. सौ. वर्षा यशोधन पाटील
मालती वसंतदाद पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली.

.सारांश : संशोधनातील संशोधन अहवाल ही अंतिम किंवा शेवटची अवस्था आहे. संशोधन अहवाल तयार करणे हे अवघड कार्य आहे. समाजात राहणाऱ्या व्यक्ती या वेगवेगळया विषयावर भाष्य करता. वेगवेगळया विषयावर स्वतःची मते मांडणाऱ्यांमध्ये महाविद्यालयातील आणि विद्यापीठातील शिक्षक ही त्यामध्ये मागे नसतात. ज्ञात आणि अज्ञात बाबींवर स्वतःचे मत हेच अंतिम मत आहे. असे ठासून सांगणारा वर्ग म्हणजे प्राध्यापक वर्ग असे समाजातील अनेक तज्ज्ञांचे मत आहे. आपण जे तोंडी बोलतो ते शब्दरूपाने मांडण्यास सांगितले तर ते मांडताना अनेक अडचणी येतात. उत्तम वक्ता हा उत्तम लेखक असेलच असे नाही आणि उत्तम लेखक हा उत्तम वक्ता असेलच असेही म्हणता येत नाही परंतु काही व्यक्ती आणि प्राध्यापक यास अपवाद असतात. उतम वक्ता हा उत्तम प्राध्यापक असतो आणि लेखक असता. चांगला लेखक हा चांगला वक्ता आणि शिक्षक असतो. संशोधकाने संशोधनविषयक वेगवेगळया अवस्था पूर्ण केल्यानंतर संशोधनाची अंतिम अवस्था म्हणजे संशोधन अहवाल होय. संशोधनासाठी समस्येची निवड हा संशोधनाचा पाया आहे. तर संशोधनाचा अहवाल हा संशोधनरूपी इमारतीवरील उभारलेला कळस असतो. प्रस्तुत शोध निबंधात संशोधन अहवालाचे स्वरूप म्हत्त्व व आदर्श संशोधन अहवाल कसा असावा याचे विवेचन केलेले आहे.

शाध संज्ञा :– संशोधन अहवाल, आशय, गृहितक, तळटिपा संदर्भ सूची,

◈ प्रास्ताविक :– सामाजिक संशोधनातील संशोधन अहवाल ही अंतिम किंवा शेवटची अवस्था आहे. संशोधकाने संशोधनाची समस्या निवड केल्यानंतर संशोधनाचा आरखडा तयार केला जातो. संशोधनाच्या आराखडयानंतर वेगवेगळया स्रोताद्वारे माहितीचे संकलन केले जाते. संकलित तथ्यांचे वर्गीकरण, सारणीकरण, सांख्यिकीय तंत्राचा वापर आणि निष्कर्ष काढले जातात. या सर्व अवस्था पूर्ण केल्यानंतर संशोधकास संशोधनविषयक अहवाल तयार करावा लागतो. संशोधनविषयक अहवाल तयार करताना संशोधकास वेगवेगळया समस्या येतात. संशोधकाने संशोधनामध्ये संकलित केलेल्या एकूण तथ्यांचे वर्गीकरण, सारणीकरण, विश्लेषण आणि अर्थबोध झाल्यानंतर विषय निवडण्याच्या पार्श्वभूमीपासून निष्कर्ष काढण्यापर्यंतची माहिती सुसूत्रीत पध्दतीने शब्दांकित करण्याची क्रिया म्हणजे संशोधन अहवाल होय. असे म्हटले जाते की, संशोधक संशोधन करताना भगीरथ प्रयत्न करून गंगेला भूपृष्ठावर आणतो. म्हणजे विखुरलेले ज्ञान संकलित करून लिखित ज्ञानामध्ये भर टाकतो. संशोधन करताना संशोधकास अनेक समस्यांना सामोरे जावे लागते म्हणजेच संशोधनात आलेल्या समस्या सोडविताना संशोधकास रक्ताचे पाणी करावे लागते.

◈ व्याख्या :–
1 प्रा. हंसराज . समाजाने केलेले परिणामकारक आणि हेतुपूर्वक निवेदन म्हणजे खरेखुरे संशोधन म्हणजे खरेखुरे अहवाल लेखन होय
2डॉ. गंगाधर कायंदे–पाटील – संशोधनासाठी विषयाची निवड करण्यापासून संकलित केलेल्या तथ्यांचे विश्लेषण करणे. गृहितकाची तपासणी सांख्यिकीय पध्दतीच्या सहाय्याने केल्यानंतर संशोधकाने योग्य आणि संशोधनात्मक भाषेत लिहिलेले वस्तुनिष्ठ स्वरूपातील प्रकरणनिहाय अनुभव म्हणजे संशोधन अहवाल होय

◈ संशोधन अहवालाची वैशिष्टये :

1. संशोधन अहवाल हा लिखित स्वरूपात असतो.
2. संशोधनासाठी विषयाची निवड केल्यापासून तथ्यांचे विश्लेषण करण्यापर्यंतचा कम संशोधन अहवाल लिहिलेला असतो.
3. संशोधनाची समस्या निवडणे ही संशोधनाची पायरी आहे तर संशोधनाचा अहवाल हा मंदिरूपी कळस समजला जातो.
4. संशोधनामध्ये वर्गीकरण आणि सारणीकरणासोबतच तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन करून काढलेले निष्कर्ष जनहितासाठी प्रसिध्द करावे लागतात, त्यास संशोधन अहवाल असे म्हणतात.
5. संशोधन अहवाल इतर अभ्यासकांना, संशोधकांना सरकारला, समाजाला धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी उपयुक्त असतो.

6. संशोधन अहवालाच्या आधारे सामाजिक सुधारणेचे धोरण तयार करून त्या धोरणाची प्रभावी पध्दतीने अंमलबजावणी करता येते.

7. संशोधन अहवालामध्ये उद्देश, अध्ययन क्षेत्र, संशोधन पध्दती, संकलित तथ्यांचे विवरण विश्लेषण, निष्कर्ष इ. चा समावेश असतो.

◈ संशोधन अहवालाचे उद्देश आणि महत्व : अहवाल हा संशोधनातील अंतिम पायरी किंवा अवस्था आहे. संशोधन अहवालाची उद्दिष्टे आणि महत्त्व पुढीलप्रमाणे –

● ज्ञानात भर आणि प्रसार : संशोधन अहवालामुळे नवीन ज्ञान प्राप्त होते व संशोधनाशी संबंधित पूर्वीच्या ज्ञानाची चिकित्सा केली जाते. या चिकित्सेतून जुने व टाकाऊ असलेले ज्ञान बाजूला सारले जाते. नवीन ज्ञान आणि संकल्पनांचा विकास होतो, हे ज्ञान परिचित होते उदा. बँकांची ए. टी. एम. सेवा, क्रेडित कार्डचा उपयोग इ. मुळे बँकांच्या कार्यपध्दतीत झालेल्या सुधारणा, समाजशास्त्रातील हुंडा प्रतिबंध, अत्याचार प्रतिबंध इ. च्या संदर्भातील संशोधन

● वास्तविक स्थितीचे आकलन : संशोधनाचा अहवाल चिकित्सक पध्दतीने तयार केला जातो. त्यासाठी शास्त्रीय पध्दतीचा अवलंब केला जात असल्याने संशोधन अहवालाद्वारे संशोधन विषयाशी संबंधित वास्तविक स्थितीचे परिपूर्ण आकलन होण्यास मदत होते. उदा. संशोधनाचे उद्देश, गृहितक, अध्ययन क्षेत्र, अध्ययन कालावधी, संशोधन पध्दती, तथ्यांचे वर्गीकरण, सारणीकरण, विश्लेषण संशोधनातील समस्या निष्कर्ष आणि उपाययोजना इ. बाबत संशोधन अहवालाद्वारे वास्तविक स्थिती चे आकलन होण्यास मदत होते.

● सार्वजनिक उपयोग : संशोधनाचा अहवाल हा समाजासाठी उपयुक्त ठरतो. समाजाचे वेगवेगळे प्रश्न संशोधकाने अभ्यासले, तर सामाजिक रूढी, परंपरा आणि सामाजविकासाचे धोरण ठरविण्यासाठी संशोधन अहवालाचा उपयोग होतो. उदा. समाजातील रूढी परंपरा, हुंडा पध्दत, सती पध्दत, एकत्र कुटुंब पध्दती, कौटुंबिक संघर्ष इ. या विषयावरील संशोधन समाजाच्या विकासासाठी उपयुक्त ठरते. समाजशास्त्रातील हे संशोधन आणि त्या संदर्भातील अहवाल सार्वजनिक उपयोगासाठी विचारात घेतला जातो.

● इतर अभ्यास संशोधन अहवाल इतर अभ्यासकांना संशोधनामध्ये संदर्भ म्हणून होत असतो. संशोधकाने संशोधनासाठी विषयाची निवड का केली, संशोधनाची उद्दिष्टे कोणती होती, अध्ययनाचा कालावधी कोणता होता, संशोधनासाठी कोणत्या पध्दतीचा अवलंब केला, संशोधनासाठी तथ्ये कोणकोणत्या स्रोताद्वारे संकलित करण्यात आली. तथ्यांचे वर्गीकरण कसे केले, कोणकोणत्या सारण्या केल्या, कोणकोणत्या संख्याशास्त्रीय तंत्राचा अवलंब केला संशोधनाचे निष्कर्ष कसे काढले, संशोधकाने कोणकोणत्या उपाययोजना सुचविल्या इ. बाबत माहिती व अभ्यास इतर अभ्यासकांना त्यांच्या संशोधनासाठी होतो. उदा. सहकारी संस्थांचा अभ्यास, दुग्ध उत्पादक संध्ङाचा अभ्यास, साखर कारखान्यांचा अभ्यास, ऊसतोड कामगारांच्या समस्या, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेंचा अभ्यास, नागरी सहकारी बँकांचा अभ्यास, महिला सहकारी बँकाचा अभ्यास इ. विषयावर वेगवेगळया कार्यक्षेत्राचा विचार करून अध्ययन करणाऱ्या इतर संशोधकांचा संशोधन अहवाल उपयुक्त ठरतो.

● भविष्यकालीन प्रगती : शिक्षण क्षेत्रातील संशोधनामुळे संशोधकास वेगवेगळया प्रगतीच्या संधी उपलब्ध होतात. उदा. वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना नियुक्तीच्या वेळेस एम. फिल किंवा पीएच. डी असेल तर आगावू / अग्रिम वेतनवाढी मिळातात, तसेच चार वर्षानंतर पीएच. डी. असलेल्या वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना वरिष्ठ वेतन श्रेणीचा फायदा मिळतो महाविद्यालयाचे प्राचार्यपद मिळविण्यासाठी पीएच. डी. ही एक अट आहे. उच्च शिक्षणातील संशोधनामुळे संशोधकास / प्राध्यापकास भविष्यकालीन प्रगतीच्या संधी उपलब्ध होत असल्यामुळे असे शिक्षक संशोधनाकडे आकृष्ट होतात. त्यांचा संशोधन अहवाल त्यांच्या भविष्यकालीन प्रगतीचा मार्ग सुकर करतो.

● नवीन संशोधनास प्रेरणा :संशोधनाचा अहवाल हा लिखित स्वरूपातील महत्त्वपूर्ण दस्तऐवज समजला जातो कोणत्याही संशोधना विषयी समस्येचे काळजीपूर्वक विश्लेषण वस्तुनिष्ठ स्वरूपात केल्या त्या संशोधनाची उपयुक्तता वाढते. उदा. ष्जागतिकीकरणाचा भारतीय उद्योगावर झालेला परिणामष या विषयावर अर्थशास्त्रामध्ये किंवा वाणिज्य शास्त्रात केलेल्या संशोधनामुळे इतर संशोधकास किंवा प्राध्यापकांनी जागतिकीकरणाचे भारतीय समाजावर झालेले परिणाम, कामगारांवर झालेले परिणाम, बँकांच्या कार्यपध्दतीवर झालेले परिणाम, भांडवलबाजारवर झालेले परिणाम, शिक्षण क्षेत्रावर झालेले परिणाम इत्यादींचा अभ्यास करता येतो. अशा संशोधन अहवालामुळे नवीन संशोधन कार्यास चालना मिळते.

◈ संशोधन अहवालाचे स्वरूप :–संशोधन अहवाल ही संशोधनातील शेवटची अवस्था असल्याने संशोधकाने विशेष काळजी घेतली पाहिजे कारण संशोधन अहवाल हा प्रकाशित स्वरूपात विद्यापीठांच्या ग्रंथालयामध्ये, सरकार दरबारी किंवा इतर तत्सम ठिकाणी उपलब्ध असतो. संदर्भासाठी या संशोधन अहवालाचा उपयोग इतर संशोधक करतात म्हणून संशोधकाने अहवाल लिहिताना विशेष काळजी घेतली पाहिजे. संशोधन अहवालाचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगता येईल –

1. संशोधनाची समाप्ती / इतिश्री ही संशोधन अहवालाने होत असल्याने संशोधन अहवाल लिहिण्याचे सर्व प्रचलित तंत्र संशोधकाने विचारात घेतले पाहिजे.
2. संशोधनाचा अहवाल हा शास्त्र आणि कला दोन्ही समजला जातो.
3. संशोधन अहवालाचे लेखन सुव्यवस्थित पध्दतीने म्हणजे – संशोधनाचे उद्देश, संशोधनाचे कार्यक्षेत्र, गृहितक, संशोधन पध्दती, तथ्यांचा तपशील, विश्लेषण, व्याख्या, निष्कर्ष आणि सूचना इ. कमाने असला पाहिजे.
4. अहवाल लिहिताना सुसंगत कम आवश्यक असल्याची जाणीव संशोधकाने ठेवावी.
5. संशोधनाची सुरूवात आणि संशोधनाची समाप्ती या दोहोंमधील प्रत्येक अवस्थांमध्ये शास्त्रीय पध्दतीचा अवलंब करून वस्तुनिष्ठा जोपासली पाहिजे.
6. संशोधनाद्वारे प्राप्त झालेले नवीन ज्ञान समाजाला, सरकारला, संशोधकास , वाचकांना उपलब्ध करून देण्याचे कार्य संशोधन अहवालाद्वारे होत असल्यामुळे संशोधन अहवालास शास्त्र समजले जाते.
7. संशोधनाचा अहवाल लिहिणे ही एक कला आहे आणि कलेमध्ये विशिष्ट व कौशल्यपूर्ण कृतींची मदत घेतली जाते.
8. संशोधन अहवालाचे स्वरूप विचारात घेताना संशोधनाचा अहवाल ही कला आहे कारण अहवाल लिहिणे म्हणजे कृती करणे होय आणि कृतीचा संबंध कौशल्यपूर्ण कार्याशी येत असल्याने संशोधन अहवालाचे स्वरूप विचारात घेताना संशोधन अहवाल लिहिणे ही एक कला, असा अर्थबोध होतो.
9. संशोधन अहवालात आकर्षकता, सुव्यवस्थित पध्दतीने टंकलेखन किंवा डी. टी. पी., भाषा शब्दाची रचना, अहवालाचा सुसंगत क्रम इ. बाबत संशोधक जागृत असला पाहिजे.
10. संशोधन अहवालाचे स्वरूप विचारात घेताना संशोधन अहवाल हे शास्त्र आणि कला दोन्ही आहे हे संशोधकाने मनात ठेवले पाहिजे. कारण वस्तुनिष्ठता आणि सुव्यवस्थित पध्दतीने विश्लेषण हा शास्त्राशी संबंधित आहे, तर लेखनातील कौशल्य भाषा, नकाशे, टापटीपण, कागदाची निवड, मुखपृष्ठ इ. बाबी संशोधकाच्या अंगी असलेला कलात्मक दृष्टीकोन स्पष्ट करतात.

◈ संशोधन अहवालाची उपयुक्तता :– संशोधनामध्ये विषयाची निवड केल्यानंतर संशोधकास वेगवेगळया अवस्थांमधून मार्गक्रमण करत संशोधन अहवालापर्यंत यावे लागते. संशोधन हे कार्य एका व्यक्तीशी किंवा संशोधकाशी संबंधित असले तरी संशोधनाचा अहवाल मात्र अनेक घटकांना उपयुक्त ठरतो त्यामुळे संशोधनाचा अहवाल एका व्यक्तीपुरता मर्यादित राहत नाही. संशोधन अहवालामुळे उपलब्ध झालेले नवनवीन ज्ञान राष्ट्रीय, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक धोरण ठरविण्यासाठी उपयुक्त ठरते. संशोधन अहवाल लिहिणे हे शास्त्र आणि कला दोन्ह आहे. संशोधनाची समाप्ती ही अहवाल लेखनाने होते आणि प्रकाशित स्वरूपातील अहवाल हा वेगवेगळया घटकांना उपयुक्त ठरतो म्हणून संशोधन अहवालाची उपयोगीता किंवा वाचक वर्ग विचारात घेणे आवश्यक आहे. एखादी कथा किंवा कादंबरी ही वाचकाची उत्कंठा सतत जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करते आणि वाचकांना पूर्ण वाचण्यास प्रवृत्त करते तशीच उत्कां चिकित्सक व वस्तुनिष्ठ स्वरूपात संशोधन अहवालात असली पाहिजे. संशोधनाशी संबंधित वेगवेगळया संकल्पना योग्य पध्दतीने स्पष्ट केलेल्या असणे आवश्यक आहे. संशोधन अहवालाचा उपयोग कोणकोणत्या घटकांना होतो याबाबत पुढील घटक महत्त्वाचे आहेत.

● संशोधन क्षेत्रातील सहकारी :– संशोधनाची मांडणी तर्कशुध्द पध्दतीने करताना संशोधनाचा उद्देश, संशोधनाचे गृहितक, कार्यक्षेत्र, संशोधनपध्दती, संकलित तथ्यांचे वर्गीकरण, सारणीकरण, विश्ेल्षण, निष्कर्ष, महत्त्वाच्या सूचना आणि भवी संशोधनासाठी विषय इ. चा समावेश संशोधन अहवालात असतो आणि संशोधन अहवालाचा क्रम सुनिश्चित असतो. संशोधन अहवालात संशोधकाने दिलेले संदर्भ आणि शब्दांची निवड करताना संशोधकाने काळजी घेतली पाहिजे. संशोधकाच्या संशोधन अहवालाचा उपयोग संशोधन विषयाशी साधर्म्य असलेल्या विषयावर संशोधन करणाऱ्या इतर सहकाऱ्यांना उपयुक्त ठरतो. संशोधन क्षेत्रातील इतर सहकारी जेव्हा संशोधकाचा अहवाल संदर्भासाठी विचारात घेतात, तेव्हा संशोधन अहवालाची चिकित्सा सहकारी करतात. त्यांची चांगली आणि वाईट मते स्पष्टपणे मांडतात व संशोधन अहवालाची चिकित्सा होते. संशोधन अहवालाची नकारात्मक चिकित्सा होऊ नये म्हणून संशोधन अहवाल लिहिताना संशोधकाने विशेष काळजी घेतली पाहिजे. संशोधनाचा अहवाल संशोधन क्षेत्रातील इतर सहकाऱ्यांना उपयुक्त ठरतो. उदा. महाविद्यालयातील वाणिज्य किंवा अर्थशास्त्र विषय शिकविणाऱ्या शिक्षकाने सहकारी बॅंकांवर संशोधन केले. त्यांचा संशोधन अहवाल ष्बॅंकष या विषयावर संशोधन करणाऱ्या इतर प्राध्यापकांना संदर्भ म्हणून उपयुक्त ठरतो. संशोधन क्षेत्रातील सहकाऱ्यांना संशोधनाचा अहवाल उपयुक्त ठरतो. पीएच. डी. केलेले काही संशोधक आपला संशोधन अहवाल इतर प्राध्यापकांना दाखवत नाहीत. त्यांच्या मनात कार्याबद्दल न्यूनगंड असतो. इतरांनी आपल्या चुका काढल्या किंवा आपल्या प्रबंधास हसले तर ध अशी भीती त्यांच्या मनात असते. थोडक्यात संशोधन क्षेत्रातील सहकाऱ्यांना संशोधन अहवालाचा उपयोग होतो.

● ज्येष्ठ अधिकारी :संशोधकाचा संशोधन अहवाल कंपन्या, निमसरकारी संस्था आणि शासनातील ज्येष्ठ अधिकाऱ्यांना धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी उपयुक्त ठरतो. उदा. नागरी सहकारी बँकांचे चिकित्सक अध्ययन, या विषयावर संशोधन केले असेल तर नागरी सहकारी बँकांच्या कार्यपध्दतीत कोणता बदल करणे आवश्यक आहे याबाबतचे संशोधकाचे निष्कर्ष हे राज्यातील नागरी सहकारी बँकांच्या व्यवस्थापकांना, संचालक मंडळाला, जिल्हा उपनिबंधक, सहकार आयुक्त, वित्त मंत्रालय आणि भारतीय रिझर्व्ह बॅंकेला उपयुक्त ठरतात. संशोधकाच्या अहवालाचे वाचक वर्ग अनेक असतात आणि प्रत्येकाच्या दृष्टिकोन हा एकच राहील असे सांगता येत नाही. संशोधन अहवालाचे निष्कर्ष आणि विश्लेषण हे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी वेगवेगळया घटकांना उपयुक्त ठरते. ष्जागतिक करणाचा भारतीय कंपन्यांनवर झ्गालेला प्रभावष या विषयावर संशोधकाने संशोधन करून अहवाल लिहिला असेल तर या अहवालाचे निष्कर्ष जागतिकीकरण, खासगीकरण, मुक्त अर्थव्यवस्थेचे स्वरूप, धोरणे, उत्पादन पध्दत, उत्पादन व वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण, कामगारांचे प्रश्न, स्वेच्छानिवृत्ती, बाजारपेठेतील स्पर्धा, वित्तीय संस्थांची भूमिका इ. वर प्रकाश टाकतात. या प्रत्येक घटकांशी संबंधित असलेले निष्कर्ष हे वेगवेगळया कंपन्यांच्या उच्यस्तरीय प्रबंधकांना धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी उपयुक्त ठरतो. संशोधन अहवाल हा वेगवेगळया संस्थामधील ज्येष्ठ अधिकाऱ्यांना मार्गदर्शक आणि धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी उपयोगी ठरतो. संशोधन अहवालातील वेगवेगळया घटकांचे स्पष्टीकरण, निष्कर्ष आणि उपाययोजना या योग्य भाषेत आणि नावीन्यपूर्ण पध्दतीने मांडलेला असणे आवश्यक आहे. संशोधन अहवालामध्ये नावीन्य नसेल तर कोणताही अधिकारी अशा संशोधन अहवालाचा उपयोग करणार नाह

● आंतरशास्त्रीय विषयातील तज्ज्ञ : संशोधनाचा अहवाल हा आंतरशाखीय विषयातील तज्ज्ञ करता. एका विषयाचा संदर्भ हा वेगवेगळया घटकांशी असतो. उदा. सातारा जिल्ह्यातील पत्री सरकाराचे व्यवस्थापन आणि कार्यपध्दत या विषयावर संशोधन केले असेल तर भारतीय स्वातंत्र्यलढयातील पत्री सरकारचे ऐतिहसिक संदर्भ हा इतिहासचा विषय होतो. पत्री सरकारचे राजकारण किंवा राजकीय व्यव्स्था हा राज्य शास्त्राचा विषय होतो. पत्री सरकारचे उत्पन्न आणि खर्च हा अर्थशास्त्राचा विषय होईलत्र व्यवस्थापन करताना जर काही धोरणात्मक निर्णय घेतले असतील तर हे निर्णय व्यवस्थापन शास्त्राचा भाग होईल आणि पत्री सरकारचे सातारा जिल्ह्यातील समाजावर झालेले परिणाम हा समाजशास्त्राचा विषय होईल. संशोधनाचा एकच विषय आणि त्यातील वेगवेगळे पैलू हे आंतरशाखीय विषयातील तज्ज्ञांना उपयुक्त ठरतात. या संदर्भातील दुसरा विषय महात्मा गांधी घेता येईल. महात्मा गांधींचा संपूर्ण अभ्यास संशोधनाच्या माध्यमातून केल्यास महात्मा गांधीचे राजकीय विचार, सामाजिक विचार, आर्थिक विचार, बुनियादी शिक्षण व्यवस्थेबद्दलचे विचार, फाळणीच्या संदर्भातील विचार आणि महात्मा गांधीचे तत्त्वज्ञान हे सर्व पैलू व विषय आंतरशाखीय अभ्यासाती तज्ज्ञांना उपयुक्त ठरतात. थोडक्यात संशोधनाचा अहवाल तयार करताना वेगवेगळया संकल्पना स्पष्ट करण्यासाठी संशोधकास वेगवेगळया विषयाचे सहाय्य घ्यावे लागते. हे सहाय्य सामाजिक संशोधनामध्ये आणि नैसर्गिक शास्त्रातील संशोधनामध्ये महत्त्वपूर्ण असते. म्हणून संशोधनाचा उपयोग आंतरशाखीय विषयातील तज्ज्ञांना होतो.

● प्रशासकीय कर्मचारी वर्ग : कोणतेही सरकार हे लोककल्याणकारी भूमिकेतून कार्य करत असते. लोककल्याणाच्या वेगवेगळया योजना तयार करून अमलात आणणरे सरकार हे पुरोगामी सरकार ठरते. वेगवेगळया सामाजिक समस्यांमधील गुंतागुंत स्पष्ट करून धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी संशोधन अहवाल उपयुक्त ठरतो. उदा. ष्गुजराथमधील वेगवेगळया दंगलींची पार्श्वभूमी, कारणे आणि उपाययोजनाष या विषयावर समाजशास्त्रामध्ये संशोधकाने संशोधन केले तर दंगली का होतात, दंगली होण्याची नेमकी कारणे कोणती, दंगलीचे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिणाम काय होतात. भविष्यात दंगली होऊ नयेत म्हणून कोणती उपाययोजना करणे आवश्यक आहे इ. वर प्रकाश टाकला जाईल. ज्या राज्यामध्ये जातीय दंगली होतात त्या राज्यात भविष्यात जातीय दंगली होऊ नयेत म्हणून या विषयावरील संशोधन अहवाल प्रशासनास निर्णय घेण्यासाठी उपयुक्त ठरतो. अशा अहवालाद्वारे वेगवेगळया पैलूंबाबत अद्ययावत, चिकित्सक आणि वस्तुनिष्ठ स्वरूपातील माहिती उपलब्ध होते म्हणून प्रशासकीय कर्मचारी आणि अधिकारी हे संशोधन अहवालाचे वाचक असतात.

● इतर वाचक : संशोधन अहवालाचे निष्कर्ष हे सर्व सामान्य नागरिकांना उपयुक्त ठरतात. ज्या नागरिकांना वाचनाची आवड आहे अशा व्यक्ती संशोधन अहवाल वाचतात. सायंकाळी जेव्हा गटागटाने फिरावयास जातात तेव्हा संशोधन अहवालावर चर्चा होते. ज्येष्ठ नागरिक, गट, सामाजिक गट, व्याख्याने, प्रबोधन इ. साठी सर्व सामान्य वाचक संशोधनाचे निष्कर्ष इतरांपर्यंत समजून उमजून पोहोचविण्याचा प्रयत्न करतो. सर्वसामान्य वाचकाचा दृष्टीकोन हा तटस्थ आणि प्रामाणिक असणे आवश्यक आहे. अन्यथा संशोधन अहवालातील एखादे संदर्भपूर्ण असलेले विधान भाषणामध्ये संदर्भरहित विधान समजून इतरांना सांगितले, तर त्याचे प्रतिसाद आणि तीव्र पडसाद समाजामध्ये पडतात. उदा. लोकमान्य टिळकांना तेल्या तांबोळयांचे नेते म्हटले जात असे. या विधानाचा योग्य संदर्भ विचारात न घेता जर असे विधान इतरांच्या संदर्भात केले तर ते चुकीचे होईल. लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळेस बीड जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष गोपीनाथ मुंडे यांनी राष्ट्रवादीचे उमेदवार (पूर्वीचे आर. एस. एस. चे कार्यकर्ते व

भाजपचे खासदार) आणि त्या जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणारे राज्यमंत्री यांच्याबद्दल केलेले विधान वर्तमानपत्रांतून विधानाचा झालेला निषेध हा सर्वसामान्य वाचकांना अनाकलनीय असतो. सर्वसामान्य वाचकांनी विधानाची पार्श्वभूमी, परिस्थिती, त्या संदर्भातील इतर बाबी यांचा एकत्रित विचार केला पाहिजे. संशोधन अहवाल वाचताना फक्त संशोध्नाचे निष्कर्ष वाचू नये, तर विषय निवडण्याच्या पार्श्वभूमीपासून तर अहवालाच्या समाप्तीपर्यंत वेगवेगळे घटक आणि पैलू चिकित्सा पध्दतीने वाचले तर संशोधन अहवालाची उपयुक्तता त्यांना कळते. म्हणून संशोधन अहवालाचे वाचक वेगवेगळ असतात. या सर्वसामान्य वाचकांमध्ये वर्तमानपत्राचे प्रतिनिधी, संपादक, आकाशवणीचे प्रतिनिधी, दूरचित्र वाहिन्यांचे प्रतिनिधी इतर संशोधन संस्था व न्यायालये इ. या सर्वांना वेगवेगळया संदर्भासाठी संशोधन अहवालाचा उपयोग होतो.
◈संशोधन अहवालाचा आशय : संशोधन अहवाल तयार करताना संशोधकास वेगवेगळया घटकांचा विचार करावा लागतो. संशोधन अहवाल समतोल होण्यासाठी पुढील घटक संशोधन अहवालात असले पाहिजेत. या सर्व घटकांना संशाधन अहवालाचा आशय असे म्हणतात.

●प्रस्तावना : संशोधन अहवाल तयार करताना संशोधनासाठी संशोधन विषयाची निवड का केली या बाबतची पार्श्वभूमी दिली पाहिजे. संशोधन विषयासाठी संशोधन विषय कसा सुचला आणि तिची योजना कशी तयार केली., प्रस्तुत विषयावर संशोधन करणे का आवश्यक आहे. त्या विषयाचे महत्व आणि संभाव्य उपयोग कसा होईल. या बाबतचे विवेचन संशोधकाने प्रस्तावनेत केले पाहिजेत.

● संशोधन विषयाचे किंवा समस्येचे वर्णन : संशोधकाने संशोधनासाठी विचारात घेतलेल्या समस्येचे प्राथमिक स्वरूप, त्या विषयावर पूर्वी झालेल्या संशोधनाचा आढावा, पूर्वीच्या संशोधनाची समस्या, संशोधकाने निवडलेली समस्या यातील परस्पर संबंध संशोधन समस्येवर अभ्यास केल्यानंतर होणारे सैद्धांतिक आणि व्यावहारिक लाभ याबाबत तपशिलवार माहिती या शीर्षकांतर्गत संशोधकाने केले पाहिजे.

● संशोधनाची उद्दिष्टे : संशोधकाने संशोधनाची समस्या निश्‍चित केल्यानंतर संशोधनामध्ये कोणकोणत्या उद्दिष्टावर लक्ष केंद्रित केले आहे ती उद्दिष्टे 1,2,3,4,5,6,7,8,9,10 इ. क्रमाने लिहिली पाहिजेत, संशोधनाची उद्दिष्टे आणि प्रकारणाची रचना यामध्ये सहसंबंध असतो. अभ्यासाची किमान 5 आणि जास्तीत जास्त 15 उद्दिष्टे असावीत. संशोधनाच्या उद्दिष्टाशिवाय संशोधनास योग्य दिशा प्राप्त होत नाही.

● संशोधनाचे गृहितक : गृहितक म्हणजे संशोधनासाठी उपयुक्त ठरणारे विधान होय. हे विधान संशोधन विषयाशी संबंधित असते. संशोधनाचे उद्दिष्ट पूर्ण व्हावे अशी संशोधकाची आणि मार्गदर्शकाची इच्छा असेल तर संशोधनाच्या प्रत्येक उद्दिष्टाशी संबंधित स्वतंत्र गृहितक / उपकल्पना मांडली जावी म्हणजे प्रत्येक उद्दिष्टांचे चिकित्सक व वस्तुनिष्ठ परीक्षण व विश्लेषण करता येते.

● संशोधन पध्दती आणि तथ्य संकलन :संशोधन करताना संशोधनासाठी उपयोगात आणलेली अभ्यासपध्दती आणि संशोधनासाठी तथ्यांचे संकलन कसे केले याबाबतची चर्चा संशोधन अहवालात केली पाहिजे. संशोधनासाठी तथ्य संकलनाच्या प्राथमिक आणि दुय्यम स्रोतापैकी कोणकोणत्या स्रोताचा अवलंब कोणत्या पध्दतीने केला याबाबतचे स्पष्टीकरण, विवेचन, अभ्यासप्रध्दती आणि तथ्य संकलन या शीर्षकांतर्गत केले पाहिजे. संशोधन अहवाल ज्या घटकांसाठी उपयुक्त करणार आहे त्या घटकांच्या संकल्पना स्पष्ट होतील. या पध्दतीने मांडल्या पाहिजेत.

● संशोधनाचे कार्य क्षेत्र आणि मर्यादा : संशोधन समस्येची निवड केल्यानंतर संशोधनाचे कार्यक्षेत्र कोणते आहे हे संशोधन अहवालामध्ये संशोधकाने स्पष्ट नमूद केले पाहिजे उदा. नाशिक तालुका, नाशिक जिल्हा, सांगली जिल्हा, वाळवा तालुका, उत्तर महाराष्ट्र, महाराष्ट्र, राष्ट्रीयस्तर किंवा आंतरराष्ट्रीयस्तर इ. संशोधकाने संशोधनाच्या कार्यक्षेत्राचा स्पष्ट उल्लेख केला पाहिजे. संशोधनामध्ये संशोधनाची मर्यादा महत्त्वाची असते. संशोधन विषयासाठी संशोधकास उपलब्ध झालेली माहिती वेगवेगळया स्रोताद्वारे उपलब्ध झालेली असते. संशोधनाचे निष्कर्ष हे त्या माहितीवरच अवलंबून आहे.

● विश्लेषण आणि निर्वचन : संशोधनामध्ये तथ्यांचे संकलन केल्यानंतर तथ्यांचे वर्गीकरण, सारणीकरण, संख्याशास्त्राचा उपयोग, निष्कर्ष, समस्या इ. कोणत्या पध्दतीने स्पष्ट केले याबाबतचे थोडक्यात विवेचन या मुद्यांतर्गत केले पाहिजे. संशोधनाच्या उद्दिष्टानुसार प्रकरणाची रचना करताना उद्दिष्टानुरूप या उपमुद्यांचे स्पष्टीकरण करताना, आकडेवारीचे वर्गीकरण, सारणीकरण आणि निष्कर्ष विचारात घेतले जातात. विश्लेषण आणि निर्वचनाची वारंवार पुनरावृत्ती होऊ नये म्हणून प्रत्येक प्रकरणातील संशोधनाच्या उद्दिष्टांचा विवेचन, उद्दिष्टानुरूप माहिती कोणत्या पध्दतीने संकलित केली, त्या माहितीचे वर्गीकरण, सारणीकरण, विश्लेषण आणि निष्कर्ष हे त्या प्रकरणंमध्ये अभ्यासले जातात. या सर्व बाबींचा गोषवारा अंतिम प्रकरणामध्ये विचारात घेणे अत्यंत आवश्यक असतो. संशोधकाने वेगवेगळया ठिकाणी दिलेल्या भेटी, घेतलेल्या मुलाखती, केलेले निरीक्षण या संदर्भात जर रंगीत फोटो घेतले असतील तर ते फोटो संशोधन अहवालामध्ये समाविष्ठ करणे उपयुक्त ठरतात त्यामुळे संशोधकाने खरोखर संबंधित घटकांच्या किंवा व्यक्तीच्या मुलाखती घेतल्या आहे, निरीक्षण केले आहे हे वस्तुनिष्ठ स्वरूपात समजण्यास मदत होते.

● प्रकरणाची रचना : संशोधकाने संशोधन अहवालामध्ये अनुक्रमणिका स्पष्टपणे उपमुद्यांसह विचारात

घेतली पाहिजे. प्रकरणाची अनुक्रमणिका विचारात घेताना पहिले प्रकरण संशोधन पध्दतीवरच राहणे योग्य ठरते. दुसऱ्या प्रकरणामध्ये संशोधन समस्येची ऐतिहासिक पार्श्वभूमी विचारात घ्यावी, तिसरे प्रकरण संशोधनाच्या अध्यन क्षेत्राच्या परिचयावर आधरित असावेत्र चौथे प्रकरण संशोधनाचे पहिले उद्दिष्ट, पाचव्या प्रकरणात संशोधनाचे दुसरे उद्दिष्ट, सहाव्या प्रकरणात संशोधनाचे तिसरे उद्दिष्ट, पुढच्या प्रकरणात संशोधनाची क्रमशः उद्दिष्टे विचारात घेतली तर संशोधन वस्तुनिष्ठ आणि सुसंगत होण्यास मदत होते.

● संशोधनाचे अंतिम प्रकरण :संशोधनाच्या अंतिम प्रकरणामध्ये निष्कर्ष, समस्या आणि उपाययोजनांचा विचार केला जातो. संशोधकाने ज्या समस्येवर संशोधन केले आहे त्या समस्येचे निष्कर्ष या प्रकरणात विचारात घेतले पाहिजे. संशोधकास आढळून आलेल्या वेगवेगळया समस्यांची चर्चा अंतिम प्रकरणात झाली पाहिजे. अंतिम प्रकरणातच संशोधकाच्या वेगवेगळया प्रकरणांचा थोडक्यात आढावा घ्यावा. संशोधनविषयक समस्या आणि निष्कर्ष विचारात घेऊन संशोधनात आलेल्या समस्या सोडविण्यासाठी कोणत्या कोणत्या उपायोजना करणे आवश्यक आहे याची स्पष्ट आणि वस्तुनिष्ठ स्वरूपात मांडणी संशोधकाने करावी. त्यास सूचना आणि उपाययोजना हे शीर्षक द्यावे. संशोधकाने केलेल्या सूचना आणि उपाययोजना या इतर घटकांना धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी उपयुक्त ठरतात म्हणून सूचना आणि उपाययोजना स्पष्ट स्वरूपात मांडल्या पाहिजेत.

● परिशिष्ट :संशोधन अहवालामध्ये अंतिम प्रकरण संपल्यानंतर संशोधकाने परिशिष्ट दिले पाहिजे. परिशिष्टास संलग्नपत्र असेही म्हणतात. अध्ययनाची प्रामाणिकता सिध्द करण्यासाठी संलग्नप्रत्र आणि परिशिष्ट उपयुक्त ठरतात. या परिशिष्टामध्ये नकाशे प्रश्नावली, अनुसूची ज्यांच्या मुलाखती घेतल्या आहे त्यांची नावे, पत्ता दूरध्वनी कमांक, मुलाखतीमध्ये विचारलेल्या प्रश्नांची यादी धोरणात्मक निर्णय, शासनाचे परिपत्रक किंवा शासनाचे आदेश, वर्तमानपत्र्ातील कात्रणे, मासिक, साप्ताहिकातील लेख इ. या सर्वसंलग्न पत्रामुळे संशोधनाची प्रामाणिकता सिध्द होण्यास मदत होते. संशोधन विषयक अभ्यासाची प्रामाणिकता सिध्द करण्यासाठी परिशिष्ठ जोडणे आवश्यक असते.

● तळटीपा : संशोधनाचा अहवाल लिहिताना संशोधक हा वेगवेगळया संकल्पनांच्या संदर्भत वेगवेगळे संदर्भग्रंथ अभ्यासत असतो. संशोधनासाठी लागणारी माहिती प्राथमिक स्रोतासोबतच दुय्यम स्रोताद्वारे संकलित केली जाते. संशोधनामध्ये वेगवेगळया तज्ज्ञांच्या षविशिष्ठष संकल्पनांच्या संदर्भातील व्याख्या विचारात घेतल्या जातात. या व्याख्या आणि संदर्भ संशोधकाने कोणत्या ग्रंथातून घेतले त्या ग्रंथाचा उल्लेख तळटीपामध्ये असणे आवश्यक असते.तळटीपा घेताना विशिष्ट तज्ज्ञांचे वाक्य लिहून पूर्ण झाल्यानंतर त्यासमोर क्रमांक दिला जातो. उदा. 1,2,3,4 प्रमाणे. प्रकरणाच्या शेवटी षएकूण तळटीपाष दिल्यास तपासण्याच्या दृष्टीकोनातून, संबंधित ग्रंथातील हा मजकूर आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी परक्षकास उपयुक्त म्हणून तळटीप ही प्रकरणाच्या शेवटी असावी.

● संदर्भग्रंथ सूची संशोधकाने संशोधन अहवालाच्या शेवटी संदर्भग्रंथाची यादी दिली पाहिजे. संदर्भग्रंथ लिहिताना वेगवेगळया पध्दतीचा अवलंब केला जातो. संदर्भग्रंथ लिहिताना मुळाक्षराप्रमाणे ।एठएब्एक्ए म्ए३३ण्ण असा क्रम किंवा लेखकाच्या आडनावाप्रमाणे लावला तर चालू शकतो.

● संशोधन अहवालाचे टंकलेखन : टंकलेखन शक्यतो संगणकावर करता आल्यास ते अधिक योग्य ठरेल. संशोधन अहवालातील प्रत्येक पानावर तीनपेक्षा जास्त शुध्दलेखनाच्या चुका चालत नाहीत. टंकलेखन करणारा नवीन असेल तर अशा चुकांची शक्यता जास्त असते. संगणकातील ैचमसस बैमबाष ष्या सुविधेमळे इंग्रजी शब्दांच्या ैचमससपदह च्या चुका होत नाहीत आणि त्याचा परिणम अहवाल मूल्यमापन करताना होतो. मराठीमध्ये शुध्दलेखनाच्या चुका नसाव्यात.

◈आदर्श संशोधन अहवाल : संशोधन अहवाल तयार करताना वेगवेगळया अडचणी निर्माण होता. या अडचणीमुळे संशोधनाचा अहवाल परिपूर्ण समजला जात नाही म्हणून आदर्श संशोधन अहवाल तयार करताना पुढील काळजी घेतली पाहिजे.

1. संशोधनाचा अहवाल शक्यतो संगणकावर मुदित केलेला असावा.
2. संशोधनाच्या अहवालाची मांडणी करण्यापूर्वी संशोधनाची समस्या स्पष्टपणे मांडण्यात यावी.
3. संशोधनाचा अहवाल हा शैक्षणिक (एम. फिल., एम.एड्., पीएच.डी.) इ. उद्देशसाठी असेल तर विद्यापीठाचे नाव, संशोधन केंद्राचे नाव आणि सादर करण्याचे वर्ष व मार्गदर्शक यांचा उल्लेख मुखपृष्ठावर असावा.
4. संशोधन अहवाल हा संस्थेसाठी किंवा शासनासाठी तयार केला जात असेल तर त्याचा उल्लेख मुखपृष्ठावर असाला पाहिजे.
5. संशोधन अहवालामध्ये संशोधनाची कोणती पध्दती, तंत्र विचारात घेतले, संशोधनाची व्याप्ती काय आहे, याबात संशोधन अहवालात प्रकाश टाकण्यात यावा.
6. संशोधन पध्दतीपूर्वी संशोधनाची पार्श्वभूमी संशोधनाचे उद्देश आणि गृहितक स्पष्ट स्वरूपात मांडलेले असावे

7. संशोधनामध्ये संकलित केलेल्या तथ्यांचे शास्त्रीय पध्दतीने वर्गीकरण, सारणीकरण, संकेतीकरण करण्यात यावे. आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी संख्याशस्त्रातील वेगवेगळया पध्दतीचा अवलंब करण्यात यावात्र त्यामुळे संशोधनाचे निष्कर्ष शास्त्रीय पध्दतीने मांडता येतात. अहवालाचे टंकलेखन आकर्षक असावेत्र अहवालातील भाषा समतोल, संतुलित आणि विवेकशील पध्दतीने वापरलेली असावी.
8. संशोधनाचा अहवाल वेगवेगळया घटकांना उपयुक्त ठरत असल्यामुळे वस्तुनिष्ठता, वैज्ञानिक, कसोटया, पारिभाषिक शब्दाचा अर्थ, संकल्पनांची मांडणी, मुद्देसूदपणा, आकर्षक बांधणी, मुद्यांना योग्य शीर्षक आणि आवश्कतेनुसार संशोधनाचा प्रामाणिकपणा दिसावा म्हणून रंगीत फोटोंचा उपयोग संशोधन अहवालात केला पाहिजे.
9. संशोधन अहवाल तयार करताना संगणकाचा जास्तीत जास्त उपयोग करावा जेणेकरून संशोधन अहवालाची आकर्षकता वाढते, तसेच वेळ, श्रम, आणि पैशाची बचत होते. टंकलेखनावर होणाऱ्या चुका संगणकामुळे होत नाहीत आणि चुका झाल्यास दुरूस्त करून घेता येतात. संगणकाच्या आधारे आकृत्या आकर्षक पध्दतीने काढता येतात, नकाशे काढता येतात, सारण्या व्यवस्थितपणे संशोधन अहवालाच्या पानावर घेता येतात, म्हणून संगणकाचा संशोधनामध्ये जास्तीत जास्त उपयोग करावा.
10. संशोधनाचा अहवाल आदर्श व्हावा असे संशोधकास वाटत असेल तर – संशोधनाची गृहिते स्पष्ट असावीत, संशोधन समस्येसाठी केलेले कार्य वस्तुनिष्ठ पध्दतीने पध्दतीने स्पष्ट करण्यात यावे.
11. अहवालाची भाषा सरळ, साधी सोपी असावी, अहवालात समाविष्ठ केलेले वेगवेगळे मुद्दे, त्यांची शीर्षके, उपशीर्षके, आकृती, टीपा, नकाशे यांना योग्य शीर्षक द्यावे तसेच योग्य क्रमांक द्यावा.
12. संशोधनासाठी संशोधकाने कोणकोणते तंत्र विचारात घेतले त्या तंत्राचे वस्तुनिष्ठ पध्दतीने विवेचन संशोधकाने संशोधन अहवालामध्ये केले पाहिजे.

◈समारोप :

थोडक्यात संशोधन अहवातील विविध घटकांचा क्रम खालील प्रमाणे असातो.

अ. संशोधन अहवालाचे मुखपृष्ठ

ब. संशोधनाचे प्रतिज्ञापत्र

क. मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

ड. ऋणनिर्देशक एकपान – रेषा –

इ. अनुक्रमणिका – 1.1, 1.2.......

फ. शोधप्रबंधातील सारण्या / आकृत्या व नकाशे

ग. संदर्भग्रंथ सूची

ह. परिशिष्ट

या सर्व नमुन्यांचा विचार करून आपणास आपल्या संशोधन अहवालाची मांडणी करता येईल.

◈ संदर्भग्रंथ सूची :

1. डॉ. गंगाधर वि. कायंदे–पाटील – संशोधन पध्दती
2- John W. Creswell - Research Design
3- Ackoff, Russell L., - The Design of Social Research
4- Allen, T. Harrell., - New Methods in social Research
5- Best, John W, and kahn, James V. – Research in Education.